# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या दिल्ली-मुंबई कॉरिडॉर प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) ३२६६५ (१२-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातून जाणाऱ्या दिल्ली-मुंबई कॉरिडॉर प्रकल्पात धुळे जिल्ह्याचा दहा वर्षापूर्वी समावेश झालेला असून अद्यापही सदर प्रकल्पाचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच मनमाड-धुळे-इंदोर या ३३९ किमी रेल्वे मार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन होऊन सात वर्षे होऊनही अद्याप काम सुरू झाले नसल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनमाड-धुळे-इंदोर प्रकल्पासाठी शासनाने जमीन भूसंपादनाचे काम सुरू करुन सदर प्रकल्प पुर्ण करण्याच्यादृष्टीने केंद्राकडे पाठपुरावा केला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त दोन्ही प्रकल्पांची कामे पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) मा.उच्चाधिकार समितीने मंजुरी दिलेल्या मान्यतेनुसार दिल्ली-मुंबई कॅारिडॅार प्रकल्पातील पहिल्या व दुस-या टप्प्यातील एकूण ५९९८.९८ हे. आर क्षेत्राची राजपत्रात अधिसुचना प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे उद्योग विभागाने कळविले आहे.

मा.अतिरीक्त सदस्य (निर्माण), रेल्वे बोर्ड यांच्या दि.२१.९.२०२३ पत्रान्वये मनमाड-मालेगाव-धुळे-इंदौर रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्रातील रेल्वे लांबीकरिता महाराष्ट्राने मोफत जमिनीसह ५०% आर्थिक सहभाग द्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सदर रेल्वे प्रकल्पामध्ये राज्याचा आर्थिक सहभाग देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेने विकास कामांची तपासणी करण्यासाठी नेमलेल्या त्रयस्थ संस्थांच्या कामात अनियमितता आढळून आल्याबाबत

**(२) ३९०६० (१८-०४-२०२२). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने विकास कामांची तपासणी करण्यासाठी नेमलेल्या त्रयस्थ संस्थांच्या (Third Party) कामात मोठी अनियमितता आढळून आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत आढळून आलेल्या संस्थांची नावे काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित संस्थावर महानगरपालिका प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच या संस्थेच्या कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२४) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई येथून सेवानिवृत्त झालेल्यांना निवृत्तीवेतन मिळण्याबाबत

**(३) ४२३०० (१२-०४-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई येथून श्री. सुरेश देवचंद सोनोने हे सेवानिवृत्त झाले असून त्यांना अद्यापही भविष्य निर्वाह निधी (पीएफ फंड) मिळाले नसून सहायक आयुक्त, भविष्य निर्वाह निधी (खाते विभाग), भविष्य निधी भवन, चारकोप, कांदिवली , मुंबई यांना दि.२५.१.२०२२ रोजी वा त्यासुमारास सुमारास लेखी निवेदन देऊनही अद्यापही भविष्यनिर्वाह निधी व पेंशन लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.
(२) श्री. सोनोने यांना भविष्य निर्वाह निधी मिळण्यासाठी/पेन्शन सुरू होण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव अंशदायी भविष्यनिर्वाह निधी कार्यालयास सादर केल्यानंतर श्री. सोनोने यांच्या अंशदायी भविष्यनिर्वाह निधी क्रमांकावर (श्री. पवार) या अन्य व्यक्तींचे नाव आढळल्याने श्री. पवार यांचे ऐवजी श्री. सुरेश देवचंद सोनोने, (निवृत्त लिपीक/ टंकलेखक) याप्रमाणे नावाची दुरुस्ती करावी असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाने अंशदायी भविष्यनिर्वाह निधी कार्यालयास कळविले आहे.
(३) व (४) श्री. सुरेश देवचंद सोनोने, (सेवानिवृत्त, लिपीक/टंकलेखक), यांच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधी वितरणाकरिता भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

---

## जोगेश्वरी (मुंबई) येथील हिंदू फ्रेन्ड्स सोसायटी रोड येथे टपाल कार्यालय पूर्ववत सुरू करण्याबाबत

**(४) ४५६१७ (२८-०९-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राठोड निवास, हिंदू फ्रेन्ड्स सोसायटी रोड, जोगेश्वरी (मुंबई) येथील जागेत मूळ जमीन मालकासोबत १०० वर्षांचा भाडेकरार करून गत ४० ते ५० वर्षांपासून टपाल कार्यालय सुरू होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जागा मूळ जागा मालकाने AIM Reality Group या कंपनीचे श्री. सिध्देश मलकानी या विकासकासोबत करारनामा करून सदरहू जागेवर पुनर्विकास योजनेचे काम सुरू केल्याने सदरहू टपाल कार्यालय हे शर्मा

इस्टेट, गोरेगाव येथे तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात आल्यानंतर सदर ठिकाणचे पुनर्विकासाचे काम विकासकाकडून पूर्ण करण्यात आले नंतरही त्याठिकाणी टपाल कार्य सुरु न केल्याने उक्त भाडेकराराचा भंग करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू टपाल कार्यालयात निवृत्ती वेतनाची खाती असलेल्या जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील ज्येष्ठ सेवानिवृत्त व इतर सर्व नागरिकांना गोरेगाव येथील नविन टपाल कार्यालयात ये-जा करणे गैरसोईचे तसेच आर्थिक नुकसानकारक होत असल्याने उक्त टपाल कार्यालय राठोड निवास, हिंदू फ्रेन्ड्स सोसायटी रोड येथील जागेत पूर्ववत सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मागणीची शासनाकडून चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू टपाल कार्य राठोड निवास, हिंदू फ्रेन्ड्स सोसायटी रोड, जोगेश्वरी (मुंबई) येथे पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०१-२०२४) :** (१) सदर जागेत टपाल कार्यालय सन १९६४ पासून कार्यरत होते.

(२), (३), (४) व (५) इमारत जीर्ण झाल्यामुळे मुंबई म.न.पा.द्वारे वीज व पाणी खंडीत केल्याने सदर टपाल कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात शर्मा इस्टेट, गोरेगाव येथे स्थलांतरीत करण्यात आले. सदर टपाल कार्यालय सद्य:स्थितीत छाया इमारत, शेर-ए-पंजाब कॉलनी, हेमा इंडस्ट्रीयल इस्टेट समोर, अंधेरी येथे कार्यरत आहे.

सदर जागेवरील इमारत पुनर्विकसित करण्यात येऊन या इमारतीस दि.२६.०४.२०१८ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

"राठोड निवास" या इमारतीच्या मालकाकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे टपाल खात्याने लघुवाद न्यायालय, वांद्रे (पू) येथे R.A.E. & R. SUIT ३७१/२०१७ अन्वये दावा दाखल करण्यात आला आहे. सदर दाव्याच्या निकाला नंतर पुढील कार्यवही करण्यात येईल.

---

## कर्करोगांवर नियंत्रण ठेवण्याकरीता प्रभावी उपाययोजना करण्याबाबत

**(५) ४७९६२ (३०-१०-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत उपचार घेणाऱ्या कर्करोग रुग्णांमध्ये शरीरातील कर्करोगाच्या पेशी नष्ट होण्यासाठी होणारे दुष्परिणाम टाळून रुग्णांचा जीव वाचविण्याकरिता रेडीएशनमध्ये कमीतकमी मात्रा देऊन अधिकाधिक कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरलेला प्रोटॉन थेरपी प्रकल्प महानगरपालिकेने मुंबईत सुरु करण्याचा निर्णय घेऊन मुंबई महानगरपालिकेतर्फे निविदा मागविण्यात येत असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत राज्यासह देशभरातून अनेक कर्करोग रुग्ण उपाचारासाठी येत असल्याने त्यांना जीवनदान देण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेतर्फे प्रोटोन थेरापी प्रकल्प सुरु करण्याच्या दष्टीने अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे तसेच कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासन तथा मुंबई महानगरपालिकेतर्फे एकूण किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, त्याद्वारे सदरहू प्रकल्प पूर्ण करुन किती निश्चितत कालावधीत कार्यान्वीत होणार आहे व या प्रकल्पाद्वारे प्रति दिन किती कर्करोग रुग्णांना औषधोपचाराची सेवा-सुविधा उपलब्ध होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) कर्करोगावरील अतिविशेष व अत्याधुनिक उपचार प्रणाली "प्रोटोन थेरापी प्रकल्प" सुरु करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महापालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

• दिनांक ३०.०४.२०२१ रोजी विशेष तज्ज्ञांची "त्रिसदस्यीय समिती" गठीत करण्यात आली आहे.

• सदर समितीमार्फत पायाभूत आरोग्य सेवा कक्ष यांच्याशी समन्वय साधून "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" यांची नेमणूक करणे आणि पायाभूत आरोग्य सेवा कक्ष व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या सहकार्याने सदर प्रकल्पाचे तांत्रिक तपशील तपासणे व प्रकल्पाकरिता जागा निश्चिती करणे ही कामे झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांसाठी अतिजटील व अतिविशेष उपकरणांचा समावेश असलेल्या प्रोटॉन थेरपी प्रकल्पाबाबत ठरविण्याचे निर्देश देण्यात आले.

• अतिजटील प्रणालीचे व कर्करोगावरील टाटा कॅन्सर रुग्णालयातील क्ष-किरण तज्ञ व आरोग्य पायाभूत सुविधा कक्ष आणि महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ यांचा विशेषज्ञ समितीमध्ये समावेश करुन समिती पुनर्गठीत करण्यात आली. तद्नंतर स्थायी समितीच्या दिनांक २०.१०.२०२१ रोजीच्या ठरावानुसार "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" नेमणूक निविदा प्रक्रिया राबवून करण्यात आली.

• "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" यांनी सादर केलेल्या प्रारुप अहवालान्वये सदर प्रकल्पास अतिविशेष व अतिजटील उपकरणांची लागणारी आवश्यकता, अतिविशेष जागेची उपलब्धता व प्रकल्पाच्या व्यवस्थापनासाठी लागणारे विशेषज्ञ तांत्रिक मनुष्यबळ इत्यादी यामुळे प्रोटॉन थेरपी प्रकल्पाची जटीलता लक्षात घेऊन सदर विशेषज्ञ समितीमध्ये टाटा रुग्णालयामध्ये कार्यरत विशेषज्ञ यांचा समावेश करुन प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाहीसाठी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

• टाटा मेमोरियल रुग्णालय व कॅन्सर उपचार, संशोधन व शिक्षा यांचे प्रगत केंद्र यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खारघर मुंबई येथे उभा केलेल्या प्रोटॉन थेरपी प्रकल्पाचा अभ्यास केला असून त्यांनी सादर केलेल्या मतानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रुग्णालयात प्रोटॉन थेरपीऐवजी लिनिअर ॲक्सलरेटर क्ष-किरण उपचार प्रणाली उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही प्रस्ताविण्यात येत आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये लिनिअर ॲक्सलरेटर क्ष-किरण उपचार प्रणालीकरिता प्राथमिक रुपये १५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. प्रोटॉन थेरपी प्रकल्प कार्यान्वित होण्याकरिता साधारण ६ ते ७ वर्षांचा अपेक्षित आहे. तथापि रेडिएशन थेरपी आवश्यक असणाऱ्या १००% रुग्णांमधील केवळ १० ते १५% रुग्णांना प्रोटॉन थेरपीचा लाभ होतो.

सदर प्रकल्पातील १ ग्रॅन्टीच्या आधारे प्रतिदिन १ किंवा २ रुग्णांना प्रोटॉन थेरपीची सेवा सुविधा उपलब्ध करता येऊ शकते. मात्र १ लिनिअर ॲक्सलरेटर क्ष-किरण उपचार प्रणालीमार्फत प्रतिदिन २५ कर्करुग्णांना उपचार उपलब्ध होतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणा-या बहुतांश प्रकल्प मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(६) ४९५९६ (१८-०१-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पग्रस्तांना योग्य मोबदला न दिल्याने मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईत सुरु असलेले अनेक प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प बाधितांसाठी निश्चित करण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याने तसेच महानगरपालिका प्रशासनाने आर्थिक गैरव्यवहार केल्याने प्रकल्प बाधित घर सोडण्यास तयार होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प बाधितांना भरपाई ही खाजगी जमिनीवरील रेडीरेकनरच्या किंमतीच्या केवळ १०० टक्के असते, तर झोपडपट्टी भागात ती आणखी कमी होऊन ७५ टक्के दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी अशा प्रकल्पग्रस्तांना २०० टक्के भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) सदर प्रकल्पग्रस्तांकरिता योग्य त्या पर्यायी सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे उपलब्ध नसल्यामुळे प्रकल्प पूर्णत्वास जाण्यास विलंब होतो हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अत्यावश्यक नागरिक निवासी प्रकल्पबाधितांना आर्थिक ऐच्छिक मोबदला देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०३.०७.२०२३ रोजीच्या सुधारीत परिपत्रकानुसार दिनांक १७.०४.१९६४ पूर्वीच्या क्षमापित अथवा मंजुरीप्राप्त अधिकृत निवासी बांधकामांना किमान रु. २५ लाख व कमाल १२९२ चौ. फुट इतक्या बांधकाम क्षेत्राकरिता सिद्धगणक प्रमाणित दरानुसार आर्थिक मोबदला देय आहे. त्याचप्रमाणे संरक्षणपात्र झोपडीधारकांना किमान रु. २५ लाख व कमाल रक्कम रु. ४० लाख इतका आर्थिक मोबदला देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

(३) बृहन्मुंबईतील प्रकल्पबाधितांना दिनांक २०.०३.२०१७ व दिनांक ०६.०२.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार आर्थिक मोबदल्याच्या रकमेचे अधिदान खालीलप्रमाणे करण्यात येते:-

• खाजगी जमिनीवरील अनिवासी प्रकल्पबाधितांना अनुज्ञेय क्षेत्रफळ x तळमजल्यावरील अनिवासी गाळ्याचे मुद्रांक शुल्क सिध्दगणक दर यानुसार

• झोपडपट्टी क्षेत्रात ०.७५ x (अनुज्ञेय क्षेत्रफळ किंवा २२५ चौ. फुट यापैकी जे कमी असेल ते क्षेत्रफळ x तळमजल्यावरील अनिवासी गाळ्याचे मुद्रांक शुल्क सिध्दगणक दर यानुसार

(४) सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अत्यावश्यक नागरिक निवासी प्रकल्पबाधितांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०३.०७.२०२३ रोजीच्या सुधारीत परिपत्रकानुसार आर्थिक ऐच्छिक मोबदला देण्यात येतो.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली २०३४ च्या विनियम ३३(१०) च्या उपविनियम ३.११ अंतर्गत पीएपी सदनिका बांधकाम सुरु केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या समाविष्ट गावांतील शाळांची मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) ४९६४४ (२७-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरीपालिकेच्या हद्दीत समाविष्ट लगतच्या ३४ गावांच्या शाळांमध्ये अद्यापही मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशाप्रकारे समाविष्ट गावांच्या शाळांमध्ये नियमित पाणीपुरवठा, नियमित खाऊवाटप, परिसर आणि स्वच्छतागृहांची साफसफाई, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश आणि पोषण आहार इत्यादीचे पुरेशा प्रमाणात वितरण तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) या संदर्भात शिक्षण विभाग प्राथमिक कडील सहाय्यक प्रशासकीय अधिकारी यांना नोडल अधिकारी नेमून शाळा हस्तांतरण प्रक्रिया पुणे महानगरपालिका पातळीवर राबविण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाशांसाठी राबविण्यात येणाऱ्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आरोग्य योजनेबाबत**

**(८) ५११११२ (२०-०१-२०२३). श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेमार्फत झोपडपट्टी विभागात राहणाऱ्या रहिवाशांना आरोग्य सुविधा घराजवळ उपलब्ध व्हावी, यासाठी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आरोग्य योजनेंतर्गत झोपडपट्टी परिसरात माहे ऑक्टोबर, २०२२ पासून आरोग्य केंद्र सुरु करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या टप्प्यात ५० आरोग्य केंद्र सुरु करण्यात येणार असून येथे सुमारे २०० डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच डॉक्टरांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी व झोपडपट्टी सदृश्य विभागात राहणाऱ्या रहिवाशांना सर्वसमावेश आरोग्य सुविधा घराजवळ उपलब्ध होण्यासाठी प्राथमिक सेवा सक्षमीकरण योजनेंतर्गत मोकळया जागेवर, पोर्टा केबीनमध्ये तसेच उपलब्ध दवाखान्यात दुसऱ्या सत्रात व बांधीव जागेत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना माहे ऑक्टोबर २०२२ पासून सुरु करण्यात आला आहे.
(२) दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी ५२ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने सुरु करण्यात आले असून, त्यामध्ये ५२ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यासाठी विभागस्तरावर २५ ते ३० हजार लोकसंख्येमागे एक आपला दवाखाना यानुसार विभागस्तरावर सहायक आयुक्त, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य पायाभूत कक्ष व विभागीय परिरक्षण विभाग यांच्या एकत्रित पाहणीनुसार हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यासाठी जागा निश्चित करण्यात येते. तसेच वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांची जाहिरातीद्वारे अर्ज मागवून निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील केईएम रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन दुरुस्त करण्याबाबत**

**(९) ५५४९८ (२७-०१-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन बंद असल्यामुळे रुग्णांचे प्रचंड प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन दुरुस्त करुन रुग्णांची होत असलेली गैरसोय दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील सिटी स्कॅन मशीन दिनांक १५.०९.२०२२ ते दिनांक २५.११.२०२२ या कालावधीत काही तांत्रिक बिघाडामुळे बंद होती. या कालावधीत रुग्णांना सिटी स्कॅनकरीता महानगरपालिकेच्या सायन व नायर रुग्णालयात पाठविण्यात येत होते.
(२) के.ई.एम. रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील बंद असलेले सीटी स्कॅन मशीन दुरुस्त करण्यात आले असून ते सद्य:स्थितीत कार्यरत आहे व सदर मशीनद्वारे दररोज १२० रुग्णांचे सीटी स्कॅन केले जात आहे. तसेच सदर रुग्णालयातील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, १ नवीन सीटी स्कॅन मशीनसाठी कार्यादेश देण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार रुग्णांचे सीटी स्कॅन महानगरपालिकेच्या दराने करण्याकरिता नजीकच्या जेरबाई वाडिया रुग्णालयाशी टाय-अप करण्यात आले असून, के.ई.एम. रुग्णालयातील रुग्ण आवश्यकतेनुसार सीटी स्कॅन चाचणीसाठी वाडिया रुग्णालयात पाठविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे महानगरपालिका हद्दीत समावेश झालेल्या ११ गावांच्या विकासकामांसाठी १२२ कोटींचा प्रस्तावाला मंजुरी मिळणेबाबत

**(१०) ५६६९४ (२४-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे ग्रामीण येथील ११ गावांचा सन २०१८ मध्ये धुळे महानगरपालिका हद्दीत समावेश झालेला असून या गावांमध्ये विकासकामे करण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाकडे १२२ कोटी रुपयांच्या निधीसाठीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

### वसई (जि.पालघर) समुद्रकिनारपट्टीवर सुरक्षा रक्षकांची (लाईफगार्ड) नेमणूक करणेबाबत

**(११) ५६७५४ (२५-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्याला लाभलेल्या सुमारे २७ किलोमीटर परिसरातील समुद्रकिनारपट्टीवरील राजोडी, भुईगाव, रानगाव, कळंब, सुरुची बाग व अर्नाळा इत्यादी बीचवर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक (लाईफगार्ड) व त्यांना लागणारी साधनसामुग्री पुरविण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या विरार येथील पदाधिकाऱ्याने

दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी आणि त्यानंतर पुन्हा दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, पालघर, आयुक्त, वसई-विरार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने वसई समुद्रकिनारपट्टीवर सुरक्षा रक्षक (लाईफगार्ड) नेमणूकीबाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१) व (२) अशा आशयाचे निवेदन महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झाले आहे.

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील समुद्रकिनाऱ्यावर जीवसुरक्षा रक्षक व रक्षा विषयक उपाय योजने अंतर्गत जीवनरक्षकांची नियुक्ती, लाईफ जॅकेट, मेगा फोन, वॉच टॉवर इ. साधनसामुग्री खरेदी, सुचना फलक लावणे, टेहाळणी मनोरे उभारणे इ. कार्यवाही करण्यात आल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मानखुर्द शिवाजीनगर आगार येथील बेस्ट उपक्रमाचा भूखंड वापरात नसल्याने कचऱ्याचे साम्राज्य पसरले असल्याबाबत**

**(१२) ५६९१४ (२४-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मानखुर्द शिवाजीनगर आगार येथील बेस्ट उपक्रमाचा काही प्रमाणातील भूखंड हा वापरात नसल्याने सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे, दुर्गंधीचे साम्राज्य पसरल्याने तेथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेस्टच्या रिक्त भूखंडाची जागा मनोरंजन उद्यान, आरोग्य सेवा केंद्र किंवा इतर समाज उपयोगाकरिता करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री व संबंधित विभागाकडे केली असल्याची बाब दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) सदर भूखंड बेस्ट उपक्रमाच्या आगाराकरिता राखीव ठेवण्यात आला होता. त्यामुळे सदर भूखंडाचा डांबरीकरुन विकास होईपर्यंत अवैध अतिक्रमण होण्यापासून रोखण्यासाठी तेथे दगडी वीट बांधकामाची आवार भिंत बांधण्यात आली होती. परंतु नजीकच्या परिसरातील झोपडपट्टीतील काही रहिवाशांनी भिंतीचा काही भाग तोडल्यामुळे तुटलेल्या भागातून काही समाजकंटक सदर भूखंडाचा वापर कचरा कुडा फेकण्यासाठी तसेच इमारतीचे मोडतोड केलेले टाकाऊ सामान टाकण्यासाठी करत होते.

सदर अतिक्रमण व अवैध कारवाया रोखण्यासाठी बेस्ट उपक्रमाने सदर भूखंडावरील कुंपण भिंतीचे पुनर्बांधकाम करणेसाठी आणि सहाय्यभूत स्थापत्य कामे पार पाडण्याकरिता दिनांक १९.०६.२०१८ रोजी सार्वजनिक जाहिरातीद्वारे निविदा मागविल्या होत्या. तथापि दरम्यानच्या कालावधीत सदर भूखंडावर सुधारीत विकास नियंत्रण नियमावली २०३४ नुसार आरक्षण प्रस्तावित करण्यात आले. सदर भूखंडावरील अरक्षण पूर्ववत करण्याची कार्यवाही सुरु असून, सदर भूखंड सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाच्या ताब्यात आहे.

सदर भूखंड अतिक्रमणापासून मुक्त ठेवण्यासाठी सदर भूखंडावर आवार भिंतीचे पुनर्बांधकाम व इतर सहाय्यभूत स्थापत्य कामे पार पाडण्याकरिता लघुत्तम देकार असलेल्या कंत्राटदाराला दिनांक २३.०२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कार्यादेश देण्यात आला आहे व त्यानुसार आवार भिंतीचे बांधकाम सुरु आहे.

(२) व (३) बेस्ट उपक्रमाच्या परिवहन सेवेचे बळकटीकरण करण्यासाठी व उपक्रमाच्या वाढीव बसगाड्यांसाठी वाहनतळ म्हणून वापरासाठी सदर भूखंडाची उपक्रमाला नितांत गरज आहे. या परिवहन सेवेचा उपयोग या भागातील रहिवाशांनाच होणार असल्यामुळे सदर भूखंड इतर कारणांकरिता देणे उचित ठरणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मुलुंड येथील अमरनगर, हनुमान पाडा येथील टेकडीवर वास्तव्यास असलेल्या घरांना पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(१३) ५९३२६ (२४-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मुलुंड येथील अमरनगर, हनुमान पाडा येथील टेकडीवर वास्तव्यास असलेल्या घरांना पाणीपुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील पश्चिम व पूर्व उपनगरातील मोठ्या टेकडी वर असलेल्या घरांना मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी सर्वेक्षण करून कृती आराखडा तयार करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सर्वेक्षण कृती आराखडा पुर्ण करण्यास शासनास किती कालावधी लागणार आहे व त्यानुषंगाने उपरोक्त घरांना पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) मुलुंड येथील अमरनगर, हनुमान पाडा येथील टेकडीवर वास्तव्यास असलेल्या घरांना सद्य:स्थितीत स्थानिक रहिवाशी मंडळामार्फत भूमिगत शोषण टाकी व उदंचन व्यवस्थेद्वारे पाणी पुरवठा होत आहे. तथापि याकरिता पूर्वी संकल्पित केलेल्या योजनेच्या कक्षेबाहेर व अतिरिक्त उंचीवर लोकवस्ती वाढल्याने काही ठिकाणी कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे.
(२) व (३) सरसकट पूर्व व पश्चिम उपनगरातील सर्व टेकडी परिसराचे सर्वेक्षण करण्यात येत नसून फक्त ज्या भागात पाणी पुरवठा समस्या निर्माण झाल्या आहेत त्याच भागाचे आवश्यक असेल तेथे सर्वेक्षण करुन त्या भागाचा पाणी पुरवठा सुधारण्यावर भर देण्यात येत आहे.

मुलुंड येथील डोंगराळ भागातील उंचावरील वस्तीसाठी पाणी पुरवठा सुधारणा करणेकामी प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मुंबई शहरासह उपनगरांचा काही भाग उंच टेकड्यासह सखल असा संमिश्र स्वरुपाचा असून अशा सर्व भूभागावरील नागरी वस्त्यांना पाणी पुरवठा करतांना तेथील स्थानिक भौगोलिक परिस्थिती पाहून विभागीय जलाशयातून काही भागांस थेटपणे तर उंचावरील टेकडीवरील नागरी वस्तीसाठी आवश्यकतेनुसार उदंचन केंद्र उभारुन पुरेशा दाबाने पाणी पुरवठा केला जातो.

सदर भागातील लोकसंख्येमध्ये होणारी वाढ लक्षात घेता पाणी पुरवठ्याच्या एकूण मागणीमध्ये वाढ होत आहे. यास्तव काही ठिकाणी शेवटच्या टोकावरील रहिवाशांच्या पाणी पुरवठ्यात काही वेळा विस्कळीतपणा येतो. मात्र बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अशा ठिकाणी सुध्दा सदर भागाचे तांत्रिकदृष्ट्या सर्वेक्षण करुन पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातात.

लोकसंख्येमध्ये होणारी अनियंत्रित वाढ लक्षात घेऊन नियमितपणे पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारणा केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील घाटकोपर (पूर्व) मधील माता रमाबाई आंबेडकर व कामराज नगर येथील मलनि:स्सारण व सांडपाणी वाहिनीचे जाळे कार्यान्वित करण्याबाबत**

**(१४) ५९४९२ (२४-०४-२०२३). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर (पूर्व) येथे असलेल्या माता रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टी भवन क्षेत्र असून येथे मोठ्या संख्येने नागरिक राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४० वर्षापेक्षा जुन्या असलेल्या उक्त क्षेत्रात मलनि:स्सारण व सांडपाणी वाहिनीची व्यवस्था नसल्याने नागरिकांना गैरसोईला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने मलनि:स्सारण व सांडपाण्याची वाहिनीचे जाळे कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी मलनि:सारण वाहिनीची व्यवस्था नाही, हे खरे आहे. तथापि तेथील झोपडपट्टीमध्ये सांडपाण्याची वाहिनी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत.

(३) माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टीचे क्षेत्र सखल भाग आहे व पूर्व द्रुतगती मार्गाच्या सेवा रस्त्याला लागून आहे. सदर सेवा रस्त्याला लागून २४०० मि.मी. व्यासाची मलनि:सारण वाहिनी बोगदा व ३००० मि.मी. व्यासाची पाण्याची वाहिनी जात आहे. तसेच गरोडिया नगर ते कामराज नगरपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत मलनि:सारण वाहिनी टाकण्यात आलेली आहे.

सेवा रस्त्यावर मलनि:सारण वाहिनी, बोगदा व पाण्याची वाहिनी असल्यामुळे सदर सेवा रस्त्यावर मलनि:सारण वाहिनी टाकणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या किमान ६ मी. रुंदीच्या अस्तित्वात असलेले रस्ते व विकास नियोजनांतर्गतच्या रस्त्यांवर मलनि:सारण वाहिनी टाकण्याची कामे केली जातात.

कामराज नगर व माता रमाबाई आंबेडकर नगर येथील सध्या अस्तित्वात असलेले रस्ते ६ मी. पेक्षा कमी रुंदीचे व तात्पुरते स्वरुपातील आहेत. सदर रस्ते विकास नियोजन २०३४ मधील रस्त्यांचे संरेखन सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांप्रमाणे नाहीत व सदर विकास नियोजन रस्त्यांवर अतिक्रमण आहे.

कामराज नगर व माता रमाबाई आंबेडकर नगर हे झोपडपट्टी क्षेत्र असून सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचेमार्फत विकासकांची नेमणूक करुन झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन व रस्त्यांचा विकास करण्यात येत आहे. विकासकाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे प्रोरेटा चार्जेस भरुन रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्यानंतर तांत्रिक बाबींची पडताळणी करुन कामराज नगर व माता रमाबाई आंबेडकर नगर क्षेत्रात मलनि:सारण वाहिनी टाकण्याकरिता कार्यवाही करण्यात येणार आहे.

कामराज नगर व माता रमाबाई आंबेडकर नगर येथे मुबलक प्रमाणात सांडपाणी वाहून नेणारी छोटी गटारे आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चेंबूर, मुंबई येथील माता रमाबाई प्रसुतिगृह येथील मोकळ्या भूखंडावर महानगरपालिकेचे सर्व सुविधांनी सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याबाबत**

**(१५) ५९९२० (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर, मुंबई येथील माता रमाबाई प्रसुतिगृह येथील मोकळया भूखंडावर सर्व सुविधांनी सुसज्ज असे रुग्णालय उभारण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून गेल्या १० ते १२ वर्षापासून वारंवार मुंबई महानगरपालिकेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन अतिरिक्त आयुक्त यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केल्यानंतर अनेक वर्षे उलटूनही याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन चेंबूर येथील माता रमाबाई प्रसुतिगृह येथील मोकळया भूखंडावर महानगरपालिकेचे सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) माता रमाबाई आंबेडकर प्रसुतीगृह ही इमारत पूर्णत: निष्कासित व पुनर्विकसित करुन सदर ठिकाणी माता व बालकांकरिता सर्व सुविधांना सुसज्ज असे रुग्णालय सुरु करण्याबाबत प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने संबंधित आराखडा बनविण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील जनरल ए.के.वैद्य मार्ग जंक्शन मालाड (पूर्व) येथील रस्त्याचे रुंदीकरणाचे काम तातडीने करणेबाबत

**(१६) ६०११६ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मालाड (पूर्व) येथील जनरल ए.के.वैद्य मार्ग जंक्शन ते मालाड, कांदिवली व बोरीवली (पूर्व) पर्यंत जाणाऱ्या ३६.६० मीटर पर्यंतच्या रिझरव्हॉयर रस्त्याचे रुंदीकरणाचे विकासकाम करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दि.२३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जनरल अरुणकुमार वैद्यमार्ग जंक्शनपासून सुरु होऊन सदरहू रस्ता नागरी निवारा परिषद, म्हाडा वसाहत या दाट रहिवाशी वसतीमधून जात असून उक्त रस्ता ६० फूट रुंद असल्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदरहू ६० फूट रस्त्याचे रुंदीकरण ९० फूट करण्यात येऊन रस्त्यावरील बांधकामे त्वरीत निष्कासीत करुन सदरहू बाधितांना त्याच परिसरातील एमएमआरडीए व विविध प्राधिकरणाने बांधलेल्या इमारतीमधील गाळे वितरीत करुन पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्याचे रुंदीकरणाचे विकासकाम केल्यास शेजारील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतुक व रहदारीचा ताण कमी होऊन या परिसरातील जनतेला सदरहू रस्त्याचा वाहतुकीसाठी व रहदारीसाठी वापर करणे सोयीस्कर ठरणार असल्याने तसेच ६० फूट रस्त्याचे रुंदीकरण ९० फूट इतके करण्यात येऊन उक्त रस्त्याचे रुंदीकरणांमधील अनाधिकृत बांधकामे त्वरीत निष्कासीत करुन व सदरहू बाधितांचे याच परिसरातील एमएमआरडीए व एसआरएचे प्राधिकरणांच्या इमारतीमध्ये गाळे वितरीत करुन पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेतर्फे वा शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार बोरीवली मागाठाणे ते गोरेगांव येथील ३६.६० मीटर रस्ता "विशेष पायाभूत प्रकल्प" म्हणून घोषित केला आहे.

जनरल ए.के. वैद्य ते आप्पापाडा या वन विभागातून जाणाऱ्या विकास नियोजन रस्त्याच्या कामाबाबतची निविदा काढण्यात आली असून, पुढील प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. सदर रस्त्यातील विविध भागांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

• **बोरीवली मागाठाणे, जय महाराष्ट्र नगर ते सिध्दार्थ नगर, ठाकूर गाव**

सदर रस्त्याचा भूभाग संपादित केल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागामार्फत रस्त्याच्या विकासाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

• **सिध्दार्थनगर ते माता बालक पालक रुग्णालय, ठाकूर गाव**

सदर रस्ता विकसित करुन वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

• **९० फुटी रस्ता ते एसीपी कार्यालय / ठाकूर महाविद्यालय, ठाकूर गाव, कांदिवली (पूर्व)**

सदर रस्ता विकसित करुन वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

• **एसीपी कार्यालय / ठाकूर महाविद्यालय ते सिंग इस्टेट, कांदिवली (पूर्व)**

सदर रस्त्यातील काही भाग म्हाडा अभिन्यासामध्ये येत असून विकासकामार्फत विकसित करण्यात येणार आहे. उर्वरित रस्त्याचा भाग झोपड्यांनी व्याप्त असून, त्यांच्या पुनर्वसन कार्यवाहीनंतर सदर रस्ता विकसित करण्यात येणार आहे. सदर रस्त्याच्या विकासकामाबाबत निविदा काढण्यात आली असून, पुढील प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

• **सिंग इस्टेट ते आकुर्ली रोड, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा येथून जाणारा रस्ता**

सदर रस्ता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या आवारातून जात असून विकसित करण्यात आला आहे व अद्याप वाहतुकीस खुला नाही.

• **आकुर्ली रोड, लोखंडवाला कॉम्प्लेक्स ते म्हाडा, क्रांतीनगर कांदिवली (पूर्व)**

सदर रस्ता वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

• **क्रांतीनगर, आप्पापाडा ते मालाड जलाशय ते गोरेगांव (पूर्व) रत्नागिरी हॉटेल**

सदर वन विभागातून जाणाऱ्या विकास नियोजन रस्त्याच्या कामाबाबतची निविदा काढण्यात आली असून पुढील प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे आहे.

(३) खडकपाडा रोड, जनरल अरुण कुमार वैद्य मार्गपासून सुरु होऊन एनएनपी रस्त्यापर्यंत असलेली ६० फुट रस्ता रेषा पुनर्स्थापित करुन ९० फुट करण्यात आली आहे.

सदर रस्ता रेषेत बाधीत साधारण १२० बांधकामधारकांना कागदपत्रे सादर करण्याबाबत नोटीस देण्यात आल्या असून, त्यापैकी केवळ २७ बांधकामधारकांनी कागदोपत्री पुरावे सादर केल्यामुळे जाहिर सूचना प्रदर्शित करुन कागदोपत्री पुरावे सादर करण्याबाबत बाधीत बांधकामधारकांना विनंती करण्यात आली आहे. तसेच प्रारुप परिशिष्ट-II तयार करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील मध्यवर्ती बस स्थानक ते जनता बाझार चौक उड्डाणपूलासाठी निधी मिळणेबाबत

**(१७) ६१६४८ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बस स्थानक ते राजारामपुरी जनता बाझार चौक येथील उड्डाणपूलासाठी सुमारे १०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून सदर प्रस्ताव प्रशासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उड्डाणपूलाच्या प्रस्तावास मान्यता देऊन काम पुर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२४) :** (१), (२) व (३) सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पीय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

---

## जोगेश्वरी (पूर्व ) (मुंबई) येथील गुंफेवर पडलेल्या घरांच्या डेब्रिजबाबत

**(१८) ६२३०९ (११-०५-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) (मुंबई) येथील गुंफेवरील घरे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई महानगरपालिकेकडून तोडण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरे तोडल्यानंतर घरांचे डेब्रिज अदयापही गुंफेच्या वर पडलेले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डेब्रिज उचलण्याकरिता के/पूर्व विभागाने तब्बल ८० लाख रुपयांचे कंत्राट दिले असून कंत्राटदारांने डेब्रीज अदयाप न उचलण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

जोगेश्वरी गुंफेच्या अवतीभवती सदर ठिकाणी यांत्रिक पध्दतीने डेब्रिज उचलणे अशक्य असल्याने केवळ मनुष्यबळाने काम करावे लागत आहे. तसेच सदर डेब्रिज केवळ गुंफेवर साचलेल्या घरांच्या तोडकामाचेच नसून वर्षानुवर्षे साचलेले तसेच पावसाळयामुळे दबून घट्ट झालेले आहे.

(३) सदर ठिकाणच्या पुनर्वसित घरांचे तोडकाम, डेब्रिज उचलणे व वाहून नेणे या एकत्रित कामाकरिता मे. चौधरी इंटरप्रायजेस यांची नियुक्ती करण्यात आली होती. यानुसार नियोजित तोडकाम पूर्ण झाले आहे.

सदर ठिकाणचे डेब्रिज उचलणे वा वाहून नेणे याकरिता एकूण रु. १७.५१ लक्ष इतकी रक्कम खर्च झाली आहे.

जोगेश्वरी गुंफा या पुरातन वास्तुचे जतन होण्यासाठी सदर काम यांत्रिक पध्दतीने शक्य नसल्यामुळे मनुष्यबळाने करणे गरजेचे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांगांना फिरत्या वाहनावरील दुकाने मोफत देण्याबाबत

**(१९) ६४८४३ (३१-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८-१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पात राज्यातील दिव्यांगांना स्वावलंबी बनवण्यासाठी व स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी हरित ऊर्जेवर चालणाऱ्या पर्यावरण पूरक फिरत्या वाहनावरील दुकाने मोफत देण्याची घोषणा करुन ५ वर्षे पूर्ण होऊन अद्याप योजना अंमलात आली नसल्याचे दिनांक २२ मे, २०२३ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली होती व विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंत्रिमंडळाने दिनांक २२ जानेवारी,२०१९ रोजी मान्यता दिली व दिनांक १० जून, २०१९ रोजी वा त्यासुमारास याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन आदेशही काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिव्यांगांच्या योजनांना वेग येण्यासाठी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागाची तयार करून देखिल पुरेसा कर्मचारी वर्ग दिला नसल्याने उक्त योजनांना वेग येऊ शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त बाब १ ते ३ ची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) दिव्यांगांना स्वावलंबी होणाच्या दृष्टीने फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. यासाठी मार्च, २०२३ पर्यंत रुपये १४.७५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सन २०२३-२४ साठी रुपये १५ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेतंर्गत महामंडळामार्फत मोफत वाहने उपलब्ध करुन देण्यासाठी वाहन खरेदीसाठी दिनांक १८.०९.२०२३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेतील रस्त्याच्या कामाच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(२०) ६५१५२ (१२-०९-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे, कळवा, मुंब्रा येथे ठाणे महानगरपालिकेच्या रस्त्याची कामे सुरु असून उक्त कामात महानगरपालिकेची व जनतेची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असून महानगरपालिकेचे अधिकारी ५% मोबदला घेतल्याशिवाय कामांना मंजुरी देत नसल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधींनी ट्विट करत केल्याची बाब दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते कॉंक्रीटीकरण ३० कोटी, रस्ते नूतनीकरण ३० कोटी, विकास आराखड्यातील रस्ते बांधणे ३० कोटी, युतीडब्लूटी पद्धतीने रस्ते बांधणी ३० कोटी, पुनःपुष्टीकरण करणे २५० कोटी, खड्डे दुरुस्ती १० कोटी व नगरविकास विभागाकडून एकात्मिक रस्ते प्रकल्पाकरीता ६६२ कोटी रुपयांची कामे ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चांगल्या रस्त्यावर फक्त डांबर टाकून कोट्यवधी रुपयांची देयके काढून अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील एकाच वेळी मोठ्या प्रमाणात रस्त्यांची कामे सुरू असून यामधील ७२ कोटी रुपयांची कामे एका काळया यादीत टाकलेल्या कंपनीला देण्यात आल्यामुळे स्थानिक नगरसेविका मृणाल पाटील यांनी आयुक्त ठाणे महानगरपालिका यांचेकडे तक्रार केली ठाणे शहर परिसरातील रस्ते कामांचा दर्जा तपासणीसाठी आयआयटी पथकाने एप्रिल, २०२३ मध्ये तपासणी केली असून थर्ड पार्टी ऑडिट तपासणीमध्ये काय आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१) अशा प्रकारचे ट्विट स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रस्त्यांची सिमेंट क्राँक्रीटीकरण, रस्त्यांची नुतनीकरण, विकास आराखड्यातील रस्ते बांधणे, यु.टी.डब्ल्यु,टी. रस्ते नुतनीकरणे इ. प्रयोजनाकरिता रुपये २०९ कोटीची तरतुद असल्याचे व रुपये ५८९.२६ कोटीचे शिल्लक दायित्व दिनांक ३१.०३.२०२३ अखेर असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच शासनाकडून रस्त्यांच्या कामाकरिता रुपये ५८७.४० कोटी निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला असून त्या अंतर्गत रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) अशा आशयाची तक्रार लोकप्रतिनिधी ट्विटद्वारे केली आहे ही वस्तुस्थिती आहे.
तथापि, महानगरपालिकेच्या अखत्यारितील रस्त्यांची कामे हाती घेताना त्या रस्त्यावरील वाहतुकींची घनता, वाहतुकीमुळे होणारे परिणाम, तेथून जाणाऱ्या जलवाहिन्या, रस्त्यांची रुंदी, खोदण्यात आलेले रस्ते, इ. बाबींचा सखोल विचार करण्यात येत असून त्या आधारे रस्ते बांधकामाचे नियोजन करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
सदर कामांकरिता आय.आय.टी, मुंबई यांची त्रयस्त तांत्रिक लेखापरिक्षणाकरिता महानगरपालिकेमार्फत नेमणूक करण्यात आली आहे.
(५) विविध विधानमंडळ आयुधांद्वारे उपस्थित होणाऱ्या आक्षेपांचे गांभीर्य विचारात घेता, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याचे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सूचना देण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागातील थकीत रकम वसुलीबाबत

**(२१) ६५१८७ (३१-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२२-२०२३ च्या मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्याने २६७ कोटी ८८ लक्ष रुपयांचा मूळ कर तसेच ८७ कोटी ३१ लाख रुपयांचा दंड अशी एकूण ३५५ कोटी १९ लाख रुपयांची थकीत रक्कम वसुलीसाठी ६७ थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थकबाकीदाराच्या विविध मालमत्ता जसे निवासी, वाणिज्य, खुली जागा अश्या मालमत्ता धारकाच्या इतरही मालमत्ता शोधण्यासाठी व्यवसाईक संस्थेची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबीची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मालमत्ता कर त्वरीत वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०६ च्या अनुषंगाने थकीत मालमत्ता कराच्या

वसुलीसाठी थकबाकीदाराच्या निवासी, वाणिज्य, खुली जागा अशा मालमत्ता धारकाच्या इतरही मालमत्ता शोधण्यासाठी व्यावसायिक संस्थेची नेमणूक करण्याची प्रक्रिया सुरु असतांना दरम्यानच्या काळात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली भांडवली मुल्याधारीत मालमत्ता कर फेरविचार याचिका फेटाळण्यात आली असल्यामुळे थकीत मालमत्ता कराच्या संपूर्ण वसुलीसाठी थकबाकीदारांच्या स्थावर मालमत्तांचा शोध घेण्यासाठी व्यावसायिक संस्थेची नेमणूक करण्याकरिताची प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिका शाळांतील विदयार्थ्यांना डायबेटीस, ब्लडप्रेशर झाल्याबाबतचा आरोग्य तपासणीचा अहवाल

**(२२) ६५६०९ (२८-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका शाळांतील ८ हजार १५८ विदयार्थ्यांना उच्च रक्तदाब तर ५ हजार ३२८ विदयार्थ्यांना मधुमेह असल्याचा अहवाल नुकतेच महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०२२ ते आतापर्यंत केलेल्या आरोग्य तपासणीच्या अहवालातून निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभाग व शालेय आरोग्य विभागाच्या वैद्यकीय पथकामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील इ. १ ली ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा माहे जून ते एप्रिल या शैक्षणिक वर्षात क्रमश: प्रत्येक शाळेत जाऊन वैद्यकीय तपासणी केली जाते.
राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांमध्ये आढळून येणारे व्यंग, त्वचारोग, कानाचे आजार, ह्रदयाचे विकार, श्वसन संस्थेचे आजार, क्षयरोग, कुष्ठरोग, अपस्मार / एपिलेप्सी, दातांच्या समस्या, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार व वाढीच्या इ. लहान मुलांमधील आजार इत्यादी प्रकारच्या ४D'S चे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य उपचार करण्याचे व उपचारासाठी संदर्भित करण्याचे मुख्य उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. तथापि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर तपासणीमध्ये मधुमेह व उच्च रक्तदाबची तपासणी अंतर्भूत नाही.
(२) वैद्यकीय तपासणीत ज्या विद्यार्थ्यांमध्ये जास्त वजन व स्थूलपणा आढळतो त्यांना समतोल आहार व दैनंदिन कसरत याविषयी आरोग्य शिक्षण दिले जाते. याबाबत पालकांना अवगत करुन आवश्यकतेनुसार पुढील तपासणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका दवाखाना व रुग्णालयात संदर्भित केले जाते. तसेच वैद्यकीय पथकामार्फत शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना पालक-शिक्षक सभांद्वारे समतोल व पौष्टिक आहार, शारिरीक स्वच्छता, विविध आजार इ. विषयांवर आरोग्य शिक्षण दिले जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अपंगांच्या अनुदानित विशेष शाळा/ कार्यशाळांना शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीसाठी नियमबाहय प्रमाणपत्रे देऊन केलेला गैरव्यवहार

**(२३) ६५६७५ (३१-०८-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगांच्या अनुदानित विशेष शाळा/ कार्यशाळांना शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीसाठी नियमबाहय प्रमाणपत्रे देऊन वित्तीय व प्रशासकिय अनियमितता केलेल्या अधिकाऱ्यांवर गेल्या चार वर्षात कोणतीही कारवाई न होता, सदर गैरव्यवहार दडपण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत केलेल्या चौकशी अहवालात सदर अधिकाऱ्यांवर प्रशासकिय व फौजदारी कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन अपंग कल्याण आयुक्त, सहायक आयुक्त आणि निरीक्षक यांनी सदर गैरव्यहार माहे जानेवारी, २०१९ ते मार्च, २०१९ या तीन महिन्यांत केले असून, या तीन अधिकाऱ्यांनी संगनमत करुन २०० ना-हरकत प्रमाणपत्रे दिली होती, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, सदर प्रमाणपत्र वाटपामध्ये या अधिकाऱ्यांनी एक प्रमाणपत्र देताना त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार नियमबाह्य प्रमाणपत्रे देवून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०१-२०२४) :** (१) व (२) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी जानेवारी, २०१९ ते मार्च, २०१९ या कालावधीत ना-हरकत प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्राचे नूतनीकरण व दिव्यांगांच्या शाळांना अनुदानाच्या शिफारशींच्या प्रकरणामध्ये झालेल्या वित्तीय व प्रशासकीय अनियमिततेबाबत दिनांक ९.४.२०१९ व दिनांक २९.४.२०१९ च्या पत्रान्वये सबंधितांविरुध्द कारवाई करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.
(३), (४) व (५) अंशत: खरे आहे. तत्कालीन आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यानी दिनांक ९.४.२०१९ व २९.४.२०१९ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सचिव, दिव्यांग कल्याण यांची दिनांक ३१.७.२०२३ च्या आदेशानुसार समिती स्थापन करण्यात आली असून या समितीने दिनांक २४.८.२०२३ रोजी चौकशी अहवाल शासनास सादर केला असून मा.मंत्री, दिव्यांग कल्याण महोदयांकडून दिनांक १२.१०.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील सांताक्रुझ (पूर्व) हंस भ्रुगा रोडलगत असलेली मलनि:स्सारण वाहिनी कार्यान्वित करण्याबाबत

**(२४) ६५९८० (३१-०८-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सांताक्रुझ (पूर्व) हंस भ्रुगा रोडलगत मुंबई विदयापीठ गेटपासून पश्चिम मार्गापर्यत मध्यभागी (रस्त्याच्या दक्षिण बाजुला) अस्तित्वात असलेली ६०० मि.मी व्यासाची मल:निसारण वाहिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मार्फत बांधण्यात येणाऱ्या उन्नत मार्गाच्या कामांमुळे व रस्त्यांच्या कामामुळे अनेक ठिकाणी तुटलेली असल्यामुळे मलनिस्सारण वाहिनी कार्यान्वित नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मलनि:स्सारण वाहिनी सर्व्हिस रोडवर स्थलांतरित करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत बांधण्यात येत असलेल्या सर्व्हिस रोड व उडडाणपुलाच्या कामांमध्ये अंतर्भूत करण्यात येण्याबाबत मुंबई महानगरपालिका संबंधित अधिकाऱ्यासमवेत झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ६०० मि.मि व्यासाच्या मलनिस्सारण वाहिनी स्थलांतरण करुन कार्यान्वित करण्यास विलंब होत असल्याने राजेंद्र कांबळे मार्ग, वाकोला येथे टाकण्यात आलेली नविन मलनिस्सारण वाहिनी हंस भ्रुगा रोडवर अस्तित्वात असलेल्या मुख्य मलनिस्सारण वाहिनीस जोडून कार्यान्वित करण्याचे काम गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरहू मलनिस्सारण वाहिनी कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात ये आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तावित मलनि:सारण वाहिनीचा अंदाजे २०० मी. लांबीचा भूभाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) प्रस्तावित सेवामार्गिकेतून जातो व या सेवामार्गिकेचा भूभाग एअरफोर्स ऑथॉरिटीच्या (आरआर-२) अखत्यारीत असल्यामुळे सदर भूभाग एअरफोर्स ऑथॉरिटीकडून हस्तांतरीत करण्याकरिता संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
सदर प्रमाणपत्र प्राप्त होताच स्थलांतरीत नवीन मलनि:सारण वाहिनी एमएमआरडीएमार्फत टाकण्यात येऊन ती कार्यान्वित करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## पुणे येथील फुरसुंगी, उरुळी (देवाची) या भागातील कचरा डेपोची जागा महापालिकेकडून वगळण्याबाबत

**(२५) ६६३०२ (२४-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेतून फुरसुंगी, उरुळी (देवाची) ही गावे वगळताना कचरा डेपो पुणे महानगरपालिकेत ठेवण्याची घोषणा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र येथील कचरा डेपो नव्याने होऊ घातलेल्या नगरपारिषदेकडे असावा व यासंदर्भातील कचरा डेपोचा सर्व्हे नंबर पालिकेतून वगळण्यात यावा, अशी येथील नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन सदरील कचरा डेपोची जागा महापालिकेतून वगळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशी बाब नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातुन निवृत्त झालेल्या शिक्षकांच्या ७ व्या वेतन आयोगाच्या मागणी संदर्भात

**(२६) ६६७९६ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातून दिनांक १ जानेवारी, २०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांना व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतनाचा लाभ दिलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे दिनांक १ जानेवारी, २०१६ ते १ जानेवारी, २०२१ पर्यंतच्या थकीत रक्कमेचे हप्ते देण्यात आलेले आहे काय,
(४) तसेच दिनांक १ जानेवारी, २०१६ ते १ जानेवारी, २०२१ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पेन्शन विक्री, ग्रॅच्युटी व रजा रोखीकरण देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पुणे मनपाच्या शिक्षण विभागातील सर्व सेवकांना वेतन देण्याबाबत शासनाचे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) फरकाचा पहिला हप्ता माहे मे, २०२३ मध्ये देण्यात आलेला आहे.
(४) दि.०१.०१.२०१६ ते दि. ०१.०१.२०२१ या काळात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर सेवकांपैकी ज्या सेवकांचे पेन्शन प्रकरण मान्य झाले आहे, अशा सेवकांना ग्रॅज्युटी व पेन्शन विक्रीचा लाभ दिला आहे.
(५) शासन मान्यतेनुसार कामकाज सुरू असल्याचे पुणे महानरपालिकेने कळविले आहे.
(६) सेवापुस्तकात काही प्रमाणात त्रुटी असल्याने विलंब होत आहे.

---

**परभणी शहरातील पाणी पुरवठा, रस्ते, नाल्यांचे बांधकाम व अन्य मुलभूत समस्यांबाबत**

**(२७) ६६८५५ (२५-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरात पाणी पुरवठा, रस्ते, नाल्यांचे बांधकाम व अन्य मुलभूत समस्यांना गेल्या कांही दिवसांपासून नागरीकांना सामोरे जावे लागत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्यःस्थितीत महापालिकेवर प्रशासक काळ असल्यामुळे जनसेवकही सक्रीय नसल्याने या मुलभूत सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शहरातील नागरीकांना मुलभुत सुविधा पुरविण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासह शहरात सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

परभणी महानगरपालिकेद्वारे दर २ दिवसाला १३५ LPCD पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

अमृत २.० योजने अंतर्गत मल:निस्सारण प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल महानगरपालिकेकडून शासनास दिनांक १६.११.२०२२ मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहेत.

परभणी महानगरपालिकेस महानगरपालिका मूलभूत सोईसुविधा अंतर्गत व विशेष रस्ता अनुदान योजने अंतर्गत ५३.८९ कोटी व इतर विकास योजनांतर्गत रु.२९.७० कोटी असा एकूण रु.८२.५९ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून सदर विकास कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि. बीड) येथील बसस्थानकाचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्याबाबत

**(२८) ६७१४० (३१-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) येथे मोडकळीस आलेल्या बसस्थानकाचे नुतनीकरण करण्यासाठी चार कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु शासनाने दिलेल्या निधीतून महामंडळाने रुपये २ कोटी २० लाख कंत्राटदाराला अदा केल्याने बसस्थानकातील ५० टक्के कामे अर्धवट राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई हे जिल्हास्तरीय शहर असून या ठिकाणी प्रवाशांची प्रचंड वर्दळ असून बसस्थानकातील अर्धवट कामामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे उर्वरित रुपये १ कोटी ४० लाख निधी तातडीने उपलब्ध करुन देऊन अर्धवट कामे पूर्ण करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे परिवहन मंत्री यांचेकडे दिनांक ३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित निधी उपलब्ध करुन बसस्थानकाचे अर्धवट काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२४) :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) अंबाजोगाई बसस्थानकाच्या मुख्य इमारतीचे संपुर्ण काम करण्यात आलेले आहे. बसस्थानकाच्या वाहनतळाचे काँक्रीटीकरण करणे हे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे निधीमधून करणेकरीता प्रस्तवित करण्यात आलेले आहे.

---

### पुणे शहराच्या विविध भागातील महिला व पुरुषांसाठीच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या संख्येत मोठी तफावत असल्याबाबत

**(२९) ६७४११ (२४-०८-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या विविध भागातील महिला व पुरुषांसाठीच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या संख्येत मोठी तफावत असल्याची बाब एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच ठिकाणी चार तासांपेक्षा अधिक काळ नागरिक थांबत असतील तर आंतरराष्ट्रीय नियमानुसार पन्नास लोकांमागे एक स्वच्छतागृह असावे असा नियम असतांना, तीनशे ते साडे तीनशे नागरिकांमागे एक स्वच्छतागृह आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) पुणे शहरामध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहाचे एकूण ५२० ब्लॉक असून यामध्ये महिला करीता २६३० व पुरूषांकरिता २८१२ सीट्स असे एकूण ५४४२ सीट्स उपलब्ध आहेत. पुरूष व महिलांसाठी ३१० ठिकाणी बेस्ट टॉयलेट ब्लॉक उभारण्यात आलेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील प्रादेशिक पहिवन विभागात बनावट कागदपत्रांव्दारे एकाच नावावर अनेक परवाने देण्यात येत असल्याबाबत

**(३०) ६८१७५ (३१-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांव्दारे बनावट कागदपत्रांव्दारे एकाच नावावर अनेक परवाना (परमिट) देत असल्याचा प्रकार सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायदयानुसार एका व्यक्तीस एक चालक परवाना, एक परवाना (परमिट) व एक बॅच देण्यात येतो परंतु हा नियम डावलून, प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांने जवळपास दिड हजार परवाने (परमिट) दिले असून या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०१-२०२४) :** (१) हे अशंत: खरे आहे.

काही प्रकरणात एका व्यक्तीस अनेक परवाने देण्यात आले आहेत.

(२) ६५ व्यक्तींनी १६१ ऑटोरिक्षा परवाने घेतल्याचे निदर्शनास आल्यावर प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांनी १६१ परवाने रद्द केले आहेत. तसेच परवानाधारकाचे वाहने अटकावून ठेवण्याचे निर्देश देऊन १२ ऑटोरिक्षा वाहने जप्त करण्यात आली आहेत. उर्वरित ऑटो रिक्षा जप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या प्रकरणी अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून न आल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही.

परिवहन आयुक्त कार्यालयाने दि. १९.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना सदर प्रकरणी दोषी खाजगी व्यक्तींविरुध्द पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी निजामपूर (जि. ठाणे) शहर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये पहारेकरी यांची नियुक्ती करण्याबाबत

**(३१) ६८३९५ (२५-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मराठी, ऊर्दू, तेलगु, कन्नड हिंदी माध्यमांच्या शाळा असून हजारोंच्या संख्येने विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा संवेदनशील भागात असून या महानगरपालिकेच्या शाळांना सुरक्षा पुरवणेकामी भिवंडी (पूर्व) येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ रोजी आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांस निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने पहारेकरी यांची नियुक्ती करण्याबाबत प्रशासन व शासनामार्फत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१), (२) व (३) अशा आशयाचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

तथापि, महानगरपालिकेचा आस्थापना खर्च व सुरक्षा विषयक आवश्यकता विचारात घेऊन पहारेकरांची नियुक्ती बाह्यस्त्रोताद्वारे करण्याची तजवीज महानगरपालिकेने ठेवली आहे. तसेच बाह्यस्त्रोताद्वारे सदरची पदे भरण्यात येतील. भिवंडी शहर संवेदनशील असल्यामुळे भिवंडी महानगरपालिकेच्या शाळेस सुरक्षितता पुरविणेकामी विभागीय पोलिस उप आयुक्त, भिवंडी शहर यांना पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दिव्यांगाच्या सक्षमीकरणासाठी स्थापित दिव्यांग वित्त व विकास महामंडळाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) ६८५५४ (३०-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने दिनांक ३ डिसेंबर, २००२ रोजी दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची स्थापन करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळाला मागील ४ वर्षापासून निधी देण्यात आला नसल्याने जुने प्रस्ताव प्रलंबित असल्याने नवीन प्रस्ताव घेत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणा आढावा घेऊन सदरील महामंडळास निधी उपलब्ध करुन दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१) दिनांक २१ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

(२) नाही.

(३) शासन निर्णय, दिनांक ०८ जून, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटीवरुन रुपये ५०० कोटी करण्यात आले असून सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता महामंडळाच्या भागभांडवलासाठी रुपये ७ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून, माहे सप्टेंबर २०२३ अखेर रुपये १.४० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागात सह आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांची सर्व पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत असल्याबाबत

**(३३) ६८६३९ (१२-०९-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाने दीर्घकाळ प्रलंबित ठेवलेली सहआयुक्त व अतिरिक्त आयुक्त पदावर पदोन्नती देणे, निवड श्रेणी देणे व इतर कार्यवाही लवकरात लवकर करण्याबाबत अधिकारी संघटनेने निवेदन देऊन विनंती केली आहे. मात्र आयुक्त कार्यालय व शासनाच्या पातळीवर आवश्यक कार्यवाही होत नसल्याने सामाजिक न्याय विभागात सह आयुक्त व अतिरिक्त आयुक्ताची सर्व पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिद्ध झाली. परंतु अजूनही अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रलंबित ठेवल्याने पदोन्नती रखडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा मुख्यमंत्री यांनी या पदोन्नतीच्या अनुषंगाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निर्देश देऊनही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) श्री. आर. डी. आत्राम यांना दिनांक ३० ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास सह आयुकत पदावर पदोन्नती दिली पण ते त्याच दिवशी सेवानिवृत्त झाले, मात्र त्यावेळी सह आयुक्तांच्या ४ जागा रिक्त असूनही अन्य अधिकाऱ्यांना पदोन्नती दिली नाही.हे खरे आहे काय,

(५) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २०२३ नुसार उप आयुक्तच्या ५ टक्के पदांना निवड श्रेणी अनुज्ञेय असूनही देण्यात आली नाही. हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन रिक्त पदे भरण्यासाठी आणि सह आयुक्त पदावर पदोन्नती व उप आयुकत

यांना निवड श्रेणी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) उपायुक्त संवर्गाची दि.०१.०१.२०१५ ते दि.०१.०१.२०२१ रोजीची अंतिम सेवा जेष्ठता यादी दि.१०.०७.२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. उपायुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ या निम्म संवर्गातून सहआयुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ संवर्गात पदोन्नती देण्याची तरतूद सेवा प्रवेश नियमात आहे. त्यानुसार सह आयुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ संवर्गातील ५ पदे पदोन्नतीने भरण्यासाठीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त आस्थापनामंडळापुढे ठेवण्यासाठी सादर करण्यात आला होता. तथापि, विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचे परिपूर्ण गोपनीय अहवाल उपलब्ध न झाल्याने दोन अधिकाऱ्यांना सहआयुक्त, समाज कल्याण, गट-अ संवर्गात पदोन्नती देण्याबाबत आस्थापना मंडळाने शिफारस केली आहे. त्यानुसार त्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(४) व (५) उपायुक्त संवर्गाची दि.०१.०१.२०१४ रोजी अंतिम सेवा ज्येष्ठतेच्या आधारे उपायुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ या निम्म संवर्गातून सहआयुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ संवर्गात पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागास विचारक्षेत्रातील दोन अधिकाऱ्यांचा प्रस्ताव आस्थापना मंडळापुढे ठेवण्यासाठी सादर करण्यात आला होता. तथापि एका अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु असल्याने तसेच त्यांनी आरक्षणाचा लाभ घेतला असल्याने त्यांचे नाव वगळून श्री.आर.डी. आत्राम यांचे पदोन्नतीस आस्थापना मंडळाने मान्यता दिली. त्यानुसार शासन मान्यतेने श्री. आर.डी.आत्राम यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले. तसेच उप आयुक्तांच्या २५ टक्के पदांना निवडश्रेणी अनुज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव तपासून सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) सह आयुक्त संवर्गात ५ पदे मंजूर असून, त्यापैकी दोन पदे प्रतिनियुक्तीने भरण्यास आली आहेत. तसेच दोन पदे पदोन्नतीने भरण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत आस्थापना मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबई अग्निशमन दलातून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन व इतर मागण्यांबाबत**

**(३४) ६८७९७ (२४-०८-२०२३). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई अग्निशमन दलातून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्त होवून ९ ते १० महिने कालावधी उलटूनही निवृत्तीवेतन सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच त्यांची सेवा निवासस्थाने, पदोन्नती, पाल्यांना ५ टक्के आरक्षण इ. मागण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या प्रलंबित मागण्यांवर कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाच्या अभिलेखानुसार माहे जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत एकूण १७८ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यापैकी १६३ कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन सुरु करण्यात आले आहे. उर्वरित १५ कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन दावे कर्मचाऱ्याने कागदपत्रे सादर न केल्याने व इतर कारणास्तव प्रलंबित आहेत.

तसेच माहे जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ या कालावधीत एकूण ४१ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यापैकी ३१ दावे निकाली काढण्यात आले आहेत. उर्वरित १० प्रलंबित दावे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) कालबध्द पदोन्नती, वेतन निश्चिती, सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकी प्रकरण, सेवा निवासस्थानाबाबतचे प्रपत्र

इ. ची लेखा पडताळणी करणे, कर्मचाऱ्यांकडून / वारसाकडून विहीत वेळेत कागदपत्रे सादर करण्यात येत नसल्यामुळे तसेच न्यायालयीन प्रकरणी धोरणात्मक बाबी इत्यादींची पूर्तता होण्यास काही प्रमाणात अवधी लागत आहे.

तथापि निवृत्ती वेतन दावे, भविष्य निर्वाह निधी निवृत्तीनंतर तात्काळ निकाली काढण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत समिती स्थापन करण्यात आली आहे.

पदोन्नती व सेवानिवासस्थानाबाबतच्या कोणत्याही मागण्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे प्रलंबित नाही. नोकरीमध्ये पाल्यांना ५ टक्के आरक्षण देण्याची कोणतीही तरतूद सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या धोरणानुसार अंतर्भूत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचे उत्पन्न वाढविण्याच्या धोरणाबाबत

**(३५) ६९००३ (०४-०९-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचे उत्पन्न वाढीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतीवर जाहिराती, बॅनर, उभारणे, वर्गखोल्या अभ्यासिका / वाचनालय, खाजगी क्लासेसला भाडे तत्वावर उपलब्ध करून देणे तसेच शाळेलगतची मैदाने बाह्य संस्थांना क्रीडा, स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता भाडेतत्वावर देणे अशा प्रकारे येत्या आर्थिक वर्षात नवीन उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याचे विचाराधीन असून त्यानुषंगाने अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागाला अत्यावश्यक कामांसाठी अर्थसंकल्पामधून भरीव तरतूद करण्यात येत असल्याने उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी या चुकीच्या धोरणास आक्षेप असल्याचे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांस पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायायलाने सन २०१३ मध्ये दिलेल्या शपथपत्राचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धोरण रद्द करण्याबाबत प्रशासन व शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये आयुक्त तथा प्रशासक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी याबाबत उल्लेख केला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सन २०१३ साली दिलेले कोणतेही शपथपत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखामध्ये दिसून येत नाही. तथापि सन २०११ चे शपथपत्र महानगरपालिकेचे रिक्त भूखंड बाह्य संस्थेला न देणेबाबत आहे. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १३.०१.२०१० रोजीच्या परिपत्रकान्वये, बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेच्या कोणत्याही वर्गखोल्या बाह्य संस्थांना शैक्षणिक व अन्य कोणत्याही कारणांकरिता भाड्याने देण्यात येत नाहीत. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विधी विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

(४) कोविड पार्श्वभूमीवर उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याकरिता सदर उपक्रम हाती घेण्याबाबतची प्रशासकीय मंजुरी घेण्यात आलेली आहे. परंतु धोरण झालेले नाही. त्यामुळे सदर धोरण रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी पूर्व (जि.ठाणे) येथील स्मशानभूमीतील समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(३६) ६९००४ (०४-०९-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी पूर्व (जि.ठाणे) येथील फेणे गाव, ताडाळी गाव इ. स्मशानभूमीमध्ये मृतदेहाची नोंद करणेकामी कर्मचारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे स्मशानभूमीमध्ये गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लहान बालकांचे मृत दफन केले जात असलेल्या दफनभूमीमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा साचल्याने दुर्गंधी पसरलेली आहे, तसेच मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ जून, २०२३ रोजी आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांस निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) अशा प्रकरचे निवेदन प्राप्त झाल्याची बाब भिवंडी महानगरपालिकेने कळवली आहे.

तथापि, भिवंडी महानगरपालिकेने सदर विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-
१) भिवंडी पूर्व (जि.ठाणे) येथील फेणेगांव, ताडाळी गांव स्मशानभुमीमध्ये स्मशानभुमी कामगारांची नेमणुक केली आहे.
२) सदर स्मशानभुमीच्या संरक्षण भिंती लगतचे रहीवाशी व इतरांना स्मशानभुमीमध्ये कचरा न टाकण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.
३) तसेच स्मशानभुमीच्या संरक्षण भिंतींची उंची वाढविणेबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.
४) महानगरपालिकेने सदर स्मशानभुमीमध्ये साफ-सफाईचे कामकाजासाठी सफाई कामगार नेमले असून संबधीत आरोग्य निरिक्षक यांचेकडून सदर ठिकाणी वेळोवेळी साफ-सफाई करण्याकामी देखरेख ठेवण्यात येत आहे.

तसेच रात्री - अपरात्री स्मशानभुमीमध्ये मयत आल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना त्वरित बोलावून स्मशानभुमी व परिसर साफ - सफाई करुन घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी पुणे महानगरपालिकेने सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी तयार केली असल्याबाबत

**(३७) ६९६०३ (०४-०९-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी पुणे महानगरपालिकेने सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी तयार केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही उपविधी राज्य शासनाच्या अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असल्याने महानगरपालिकेला नविन नियमानुसार दंड आकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासनाने या संदर्भात संपूर्ण राज्यासाठी "महानगरपालिकांसाठी घनकचरा (व्यवस्थापक व हाताळणी), स्वच्छता आरोग्य नियम" दि. १९ डिसेंबर २०१८ अन्वये पारित केले आहेत. तसेच "महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री,वाहतूक, हाताळणी,साठवणूक) अधिसूचना २०१८", दि.२३ मार्च २०१८ अन्वये पारित केले आहे. सदर नियमान्वये पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात दंडाबाबत कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण मुंबईतील प्रियदर्शनी पार्क ते वरळी सी-लिंक (कोस्टल रोड)**
**या सागरी मार्गाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(३८) ६९९०३ (०४-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यासाठी सागरी किनारा मार्गाचे (कोस्टल रोड) प्रियदर्शनी पार्क ते वरळी सी-लिंक या ११ कि.म रस्त्याचे काम गत एक वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सागरी किनारा मार्गाचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०१-२०२४) :** (१), (२) व (३) दिनांक २० ऑगस्ट, २०२३ पर्यंत मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाचे जागेवर ७८% काम पूर्ण झाले आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा कालावधी माहे नोव्हेंबर, २०२३ असून, वरळीकडील भागाचा पूर्णत्वाचा कालावधी माहे मे, २०२४ असा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघोली (पुणे) येथील परिसरातील नागरिकांसाठी सुसज्ज रुग्णालय उभारण्याबाबत**

**(३९) ७०७२३ (३१-०८-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वाघोली गावाचा महानगरपालिकेमध्ये समावेश होऊन दीड वर्ष झाले असून या गावाची लोकसंख्या सुमारे साडेतीन लाख असून येथील नोकरी व व्यवसायानिमित्त वाढत्या नागरिकांना सुसज्य असे शासकीय रुग्णालय उपलब्ध नसल्याने नागरिकांना पुणे येथील ससून रुग्णालयात अथवा येरवडा भागात २५ ते ३० किलोमीटर लांबच्या ठिकाणी उपचारासाठी जावे लागत असल्याचे निदर्शनास आलेआहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघोली येथील नागरिकांच्या सोईकरिता पुणे महानगरपालिकेचे सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०१-२०२४) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या कार्यकक्षेत समावेश करण्यात आलेल्या वाघोली गावामध्ये पुणे जिल्हा परीषदेमार्फत आरोग्य सुविधा पुरविणेकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. या केंद्रामार्फत स्थानिक नागरीकांना आरोग्यविषयक सेवा सुविधा पुरविण्यात येतात. यामुळे नागरीकांना २५ ते ३० किलोमीटर लांबच्या ठिकाणी उपचारासाठी जावे लागते हे खरे नाही.

(२) पुणे महानगरपालिकेमार्फत सदर परिसरामध्ये साई सत्यम पार्क, वाघोली व जुनी जिल्हा परिषद शाळा क्र. १९२, वाघोली गावठाण येथे आरोग्य वर्धीनी केंद्र कार्यन्वित करणेची प्रक्रिया सुरू आहे.

तसेच वाघोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तथापि, पुणे जिल्हा परिषदेने सदर प्राथमिक आरोग्य केंद्र इतरत्र स्थलांतरीत करणेबाबत मान्यतेचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांच्याकडे पाठविला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेतील कमला नेहरु रुग्णालयातील डायलिसिस मशीन बंद असल्याबाबत

**(४०) ७०९२५ (१२-०९-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत कमला नेहरू रुग्णालयात आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना कमी दरात डायलिसिसची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एका संस्थेबरोबर करार केला असून, गेल्या अनेक महिन्यांपासून येथील १५ पैकी १३ डायलिसिस मशीन बंद असल्याची बाब दिनांक २५ जून, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महानगरपालिकेने देयके न दिल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याने त्याचा थेट परिणाम रुग्णसेवेवर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

लायन्स क्लब ऑफ पुना या संस्थेला सदर युनिट चालविण्यास देण्यात आले असून सदर संस्थेच्या तांत्रीक अडचणी, जुन्या मशीन नादुरूस्त असणे व टेक्नीशियनची अनुउपलब्धता या कारणाने सुमारे एक महिना तेरा डायलेसिस मशीन्स बंद होत्या.

(२) हे खरे नाही. माहे जुलै अखेर पर्यंतची देयके अदा करण्यात आलेली आहे.

(३) सदर संस्थेस दि.२०.०६.२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली व दि.१४.०७.२०२३ रोजी पुर्ण क्षमतेने डायलेसिस केंद्र कार्यान्वित न आलेस करारनामा रद्द करणेबाबत अंतिम नोटीस देण्यात आली तसेच सदर संस्थेकडून रू.२५०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तथापि, सदर संस्थेचे काम समाधानकारक नसल्याने संस्थेबरोबरचा करारनामा दि. ३१.१०.२०२३ रोजी रद्द करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचाऱ्यांना परीक्षेची अट शिथिल करुन कालबध्द पदोन्नतीचे लाभ मंजूर करण्याबाबत

**(४१) ७०९५५ (१२-०९-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मुख्य लेखा परीक्षक खात्याकडून वरिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या अहर्ताकारी परीक्षेत गैरप्रकार झाल्याप्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या तत्कालिन अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक चौकशी अहवालानुसार, वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदाच्या पदोन्नतीतील अनियमिततांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन मुख्य लेखापरीक्षक जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्यावर सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ७८अ (१) (ड) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम २०१५ मधील नियम क्र. १५ नुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १७.०१.२०२३ रोजीच्या पत्रानुसार शासनाच्या वित्त विभागास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परीक्षेचा निकाल आजमितीस सुमारे साडेचार वर्षे लोटली तरी जाहीर न झाल्याने कनिष्ठ लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू परीक्षा रद्दबातल केल्यास गत साडेचार वर्षापासून निकालाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या शेकडो कनिष्ठ

लेखा परीक्षक-सहाय्यक पदावरील कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार असल्याने स्थायी समितीच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या ठरावानुसार परीक्षेची अट शिथिल करुन कालबध्द पदोन्नतीचे लाभ मंजूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) प्रस्तुत प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यासाठी तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी दिनांक ०२.०१.२०१९ रोजी तत्कालीन अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांची नेमणूक केली होती.
(२) सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ७८ अ(१) नुसार महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक या पदावरील अधिकाऱ्याची राज्य शासनासाकडून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार तत्कालीन मुख्य लेखा परीक्षक यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आली होती व सद्य:स्थितीत ते बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत नसल्याने सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम ७८ अ (१)(ड) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम २०१५ मधील नियम १५ नुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी दिनांक १७.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये वित्त विभागास कळविण्यात आले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभागातील वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सन २००४ नंतर मुख्य लेखापरीक्षक विभागात खात्यांतर्गत परीक्षा घेण्यात आली नव्हती.

तत्कालीन महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांकडून दिनांक २३, २४ व २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी खात्यांतर्गत परीक्षा घेण्यात आली. परंतु परीक्षेबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झाल्याने तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचे आदेशानुसार परीक्षेची प्रक्रिया थांबविण्यात आली व परिणामी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला नाही. नियमानुसार तक्रारींची तपासणी करुन तक्रारींची सत्यता तपासण्यात आली असून सदर परीक्षा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून आले आहे.
(४) सदर प्रकरणी अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी दिनांक ०२.०५.२०२२ रोजी अहवाल सादर केला असून, वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदाच्या पदोन्नती परीक्षा प्रक्रियेमध्ये सकृतदर्शन परीक्षापूर्व कामकाज, प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षेचे आयोजन व परीक्षा केंद्रावरील कामकाज, उत्तरपत्रिकेचे सांकेतिकीकरण / प्रशासकीय त्रुटी आढळून आल्याने सदर परीक्षा रद्द करण्यात यावी अशी शिफारस सदर अहवालामध्ये करण्यात आली आहे.

सदर प्राथमिक चौकशी अहवाल व शिफारशी महानगरपालिका आयुक्तांनी स्विकारल्या असून, सदर परीक्षा रद्द करण्यास आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. त्यानुसार वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदासाठीची परीक्षा रद्द करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिनांक २४.०७.२००७ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक ०७.०७.२००५ पासून कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांची एकाच पदावरील सातत्याची सेवा १२ वर्षे किंवा अधिक झाली आहे अशा कर्मचाऱ्यांस पदोन्नती साखळीतील त्या पदाच्या पदोन्नतीची उच्च वेतनश्रेणी, कालबध्द पदोन्नती योजनेस पात्र झालेल्या कर्मचाऱ्यास मिळते. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार कालबध्द पदोन्नती योजनेचा लाभ मिळण्यासाठी पदोन्नतीच्या सर्व निकषांची पूर्तता होणे बंधनकारक आहे. त्यानुसार कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यकांनी वरिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक पदाकरिता पदोन्नतीची अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि सदर कर्मचारी अर्हताकारी परीक्षेची अट पूर्ण करीत नव्हते. त्यामुळे ते कालबध्द पदोन्नतीच्या योजनेच्या लाभापासून वंचित होते. तथापि मानवतेच्या दृष्टीकोनातून व विशेष लाभ म्हणून महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक विभागातील कनिष्ठ लेखापरिक्षा सहाय्यकांना स्थायी समितीच्या दिनांक १०.०८.२०१६ रोजीच्या ठरावानुसार परीक्षेची अट शिथिल करुन कालबध्द पदोन्नतीचे लाभ लागू करण्यास मंजुरी देण्यात आली असून, त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना दिनांक १०.०८.२०१६ पासून कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यात गत वर्षी तयार करण्यात आलेले रस्ते खचल्याबाबत**

**(४२) ७१०९५ (०४-०९-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचपाखाडी (जि. ठाणे) येथे गतवर्षी तयार करण्यात आलेला सिमेंटचा रस्ता खचल्याचे दिनांक ८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिका हद्दीतील मागील काही महिन्यांत कोपरी, सावरकरनगर, लोकमान्यनगर या भागात रस्ते खचल्याचे तसेच इंदिरानगर येथे सिमेंट रस्ता खचला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याप्रकरणी संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनामार्फत व प्रशानामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१) व (२) पाचपाखाडी, ठाणे येथील मदनलाल धिंग्रा मार्गावरील ओपन हाऊसपर्यंत करण्यात आलेल्या रस्त्याच्या २९०० चौ.मी. क्षेत्रफळापैकी १.५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग हा जमिनखाली पोकळी निर्माण झाल्यामुळे दिनांक ०७.०६.२०२३ रोजी खचला असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तसेच इंदिरा नगर येथील जय महाराष्ट्र वॉच कंपनी ते वाल्मिकी पाडा येथील डांबरी रस्त्यामध्ये नाल्यावर बांधलेल्या दगडी बांधकामाच्या कलव्हर्टची दगडी भिंत काही प्रमाणात पोकळ झाल्याने, दिनांक २९.०५.२०२३ रोजी लगतच्या जमिनीखाली पोकळी झाल्यामुळे ३ चौ.मी. एवढा डांबरी रस्त्याचा भाग खचला असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) पाचपाखाडी, ठाणे येथील मदनलाल धिंग्रा मार्गावरील रस्त्याचे दायित्व ५ वर्षाचे असल्याने ठेकेदारामार्फत स्वखर्चाने पुन्हा काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. तसेच रस्ता बांधकाम साहित्याच्या आवश्यक त्या तांत्रिक चाचण्यांचा अहवाल व त्रयस्त लेखापरिक्षण अहवाल घेण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकने कळविले आहे.

तसेच इंदिरा नगर येथील रस्त्यामधील दगडी बांधकामाच्या कलव्हर्टची भिंत दुरूस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत रस्त्याचा वापर सुरू आहे. तसेच, सदर कलव्हर्टची आर.सी.सी. पध्दतीने पुर्नबांधणी करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलुंड विभागातील अमर नगर- हनुमान पाडा जलजोडणीस**
**वन विभागातर्फे होत असलेल्या विलंबाबाबत**

**(४३) ७१४६७ (१२-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड विभागातील अमर नगर ते हनुमान पाडा या डोंगराळ भागात सुरळीत पाणीपुरवठा व्हावा म्हणून नवीन जल जोडणी वन विभागाच्या जमिनीवरुन करण्याचा प्रस्ताव महापालिकेने वन विभागाकडे दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास वन विभागाची मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “टी” विभागातील अमर नगर, राहुल नगर, शंकर टेकडी, पंचशील नगर हनुमान पाडा,

मुलुंड (प.) या विभागातील नागरिकांना सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्यांच्या वितरण प्रणालीतून अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या समस्या भेडसावत आहेत.

सदर विभागातील नागरिकांना पाणी पुरवठ्यासारखी अत्यावश्यक सेवा सुधारण्याकरिता विविध व्यासाच्या नवीन जलवाहिन्या उदंचन व्यवस्थेसह टाकणे व इतर संलग्न करण्याबाबतचा मंजूर प्रस्ताव, प्रस्तावात नमूद भूभाग वन विभागाच्या हद्दीत येत असल्याकारणाने वन विभागाचे "ना-हरकत प्रमाणपत्र" मिळण्याकरिता दिनांक २३.०५.२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वन विभागास सादर करण्यात आला होता. तथापि प्रस्तावात नमूद अमर नगर, शंकर टेकडी, राहुल नगर व हनुमान पाडा येथे जलवाहिन्यांची कामे करण्याचे ठिकाण वन विभागाच्या आत असल्याकारणाने व पंचशील नगर येथील जलजोडणीचे ठिकाण वन हद्दीच्या बाहेर असून, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवलीच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याने सदर प्रस्ताव वन विभागामार्फत दिनांक १७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये फेटाळण्यात आला आहे.

तथापि सदर मंजूर प्रस्तावात नमूद जलवाहिनी टाकण्याची कामे ही भूमिगत असून सदर ठिकाणी पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या रहिवाशांच्या जलजोडण्या / जलवाहिन्यांच्या मार्गिकेनुसार टाकण्यात येणार आहेत. तसेच हनुमान पाडा येथील प्रस्तावित शोषण टाकी व उदंचन व्यवस्था सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या स्थानिक रहिवाशांच्या शोषण टाकी व उदंचन व्यवस्थेच्या ठिकाणीच प्रस्तावित आहेत. तसेच राहुल नगर येथील प्रस्तावित उदंचन व्यवस्था ही सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या सार्वजनिक उद्यानातील उपलब्ध जागेत करण्याचे प्रस्तावित आहे.

सबब सदर ठिकाणी जलवाहिन्या टाकण्यासंदर्भातील कामे ही रहिवाशांच्या सद्य:स्थितीत असलेल्या ठिकाणीच करण्याचे प्रस्तावित असल्याने वन विभागाच्या हद्दीतील जमिनीची / पर्यावरणाची हानी होणार नाही असे वाटत असल्यामुळे सदर विभागातील नागरिकांची पाणी पुरवठ्याची समस्या सोडविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुन:श्च वन विभागाचे "ना-हरकत प्रमाणपत्र" मिळण्याकरिता विनंती अर्ज दिनांक २९.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पुनर्विचारार्थ सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील मुलुंड (पूर्व) येथील कचराभूमी बंद करण्याबाबत

**(४४) ७१४७५ (१२-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मुलुंड (पूर्व) येथील कचराभूमी बंद करण्याबाबत मुंबई महानगर पालिकेने निविदा काढलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कचराभूमी बंद करण्याचे काम अतिशय संथगतीने होत असून, सदरहू काम किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,

(३) तसेच उक्त काम वेळेत पूर्ण न करू शकल्याने कंत्राटदार यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर काम कंत्राटदारास दिनांक १७.१०.२०१८ रोजीच्या कार्यादेशान्वये देण्यात आले आहे. दिनांक २१.१२.२०१८ रोजी सदर क्षेपणभूमी येथे कचरा टाकणे पूर्णत: बंद करण्यात आले आहे. सदर काम हे एक वर्ष मोबिलायझेशन कालावधी व पुढील पाच वर्षांत घन कचऱ्याचे शास्त्रोक्त प्रक्रिया व निष्कासनाचे काम पूर्ण करणे असे आहे.

सदर कामाचा मोबिलायझेशन कालावधी संपल्यानंतर कंत्राटदाराने काम सुरु केले. तद्नंतर कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे काही काळ सदर कंत्राटदाराचे काम थांबले होते. तथापि माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये कंत्राटदाराने पुन:श्च काम सुरु केले असून, सद्य:स्थितीत कंत्राटदाराने जास्त वेगाने काम करणाऱ्या आधुनिक प्रकारच्या विविध १९ मशिन्स

मुलुंड क्षेपणभूमी येथे तैनात केल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या वैशिष्ट्यानुसार पावसाळ्यानंतर कामाचा वेग वाढणार आहे.
(३) कोविड-१९ चा प्रादुर्भाव, अनियमित पाऊस, तौक्ते वादळ इत्यादी कारणांमुळे कंत्राटाचा कालावधी २७० दिवस वाढविण्यात आला असून, तो दिनांक २७.०६.२०२५ पर्यंत आहे. विहित कंत्राट कालावधीमध्ये सर्व अनुशेष प्रमाणासह कंत्राट पूर्ण करण्याची योजना कंत्राटदाराने दिलेली आहे.
तथापि कंत्राटदाराने कंत्राटातील अटी व शर्तींनुसार वार्षिक उद्दिष्ट (milestone) पूर्ण न केल्याबद्दल कंत्राटातील अटी व शर्तींनुसार वार्षिक दंड आकारण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील मुलुंड मधील अनेक गृहनिर्माण प्रकल्पात बंद असलेले पब्लिक पार्किंग सेवा सुरु करण्याबाबत

**(४५) ७१४८४ (१२-०९-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील मुलुंड मधील अनेक गृहनिर्माण प्रकल्पात महानगरपालिकेकडून अतिरिक्त फायदा मिळावा म्हणून अनेक पब्लिक पार्किंग सेवा मंजूर करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या या सार्वजनिक वाहनतळाची स्थिती काय आहे,
(३) तसेच, बंद असलेल्या पब्लिक पार्किंग सेवा तात्काळ सुरु करण्याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूद क्र. ३३ (२४) अन्वये खालीलप्रमाणे पब्लिक पार्किंग लॉट मंजूर करण्यात आले आहेत:-
• न.भू.क्र. ५५१/१३ मदन मोहन मालिया रोड येथील पब्लिक पार्किंग लॉट चालविण्याकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, कंत्राटदारास लवकरच स्वीकृतीपत्र देण्यात येणार आहे.
• न.भू.क्र. १३४८/ए, १३४८/बी मुलुंड (प.) येथे पब्लिक पार्किंग लॉट चालविण्याकरिता दिनांक १५.११.२०१९ रोजी ५ वर्षांच्या कालावधीकरिता स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर वाहनतळ कार्यान्वित आहे.
• न.भू.क्र. ८८४, ८८४/१ ते १०, ८८५ आणि नवीन न.भू.क्र. ८८४ ए ते सी मुलुंड (प.), एल.बी.एस. मार्ग येथे पब्लिक पार्किंग लॉट चालविण्याकरिता दिनांक १५.०२.२०१९ रोजी ५ वर्षांच्या कालावधीकरिता स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर वाहनतळ कार्यान्वित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील मैत्रीपार्क, सायन-ट्रॉम्बे रोड येथे मोतीबाग बंगल्याजवळ अनधिकृत गाळ्यांचे बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(४६) ७१५१३ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर (मुंबई) येथील मैत्रीपार्क, सायन-ट्रॉम्बे रोड येथे मोतीबाग बंगल्याजवळ अनधिकृत गाळ्यांचे बांधकाम झाले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या वतीने सदर ठिकाणचे अनधिकृत गाळे सन २०१० मध्ये मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तोडण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर ठिकाणी पुन्हा अनधिकृत गाळ्यांचे बांधकाम झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) चेंबूर (मुंबई) येथील मैत्रीपार्क, सायन- ट्रॉम्बे रोड येथे मोतीबाग बंगल्याजवळ अनधिकृत गाळ्यांचे बांधकाम झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सदर ठिकाणचे गाळे सन २०१० मध्ये मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निष्कासित करण्यात आल्याची कोणतीही नोंद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखावर उपलब्ध नाही.
(३) व (४) सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या गाळेधारकांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असून पुढील कार्यवाही कायद्यातील योग्य त्या तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील एम (पश्चिम) विभागातील इमारत व कारखाने या विभागातील पदनिर्देशित अधिकारी यांची चौकशी करून कारवाई करणेबाबत

**(४७) ७१५१४ (०४-०९-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एम (पश्चिम) विभागातील इमारत व कारखाने या विभागातील पदनिर्देशित अधिकारी नागरिकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करीत असून, अनधिकृत बांधकामांवर कारवाई न करता त्यांना संरक्षण देण्यात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेकडे दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
मुंबईतील एम (पश्चिम) विभागातील पदनिर्देशित अधिकारी यांचेमार्फत नागरिकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता प्राप्त सर्व तक्रारींवर नियमानुसार कार्यवाही केली जाते. महत्वाच्या व्यक्ती / संस्थेकडून प्राप्त तक्रारींवर प्रामुख्याने कार्यवाही केली जाते.
(२) हे खरे आहे.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १८.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून, स्थानिक लोकप्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांनी सुचविलेल्या सूचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेमार्फत पाणी धोरणाची योग्य अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(४८) ७१५५१ (१२-०९-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेने प्रत्येकाला हक्काचे पाणी मिळावे यासाठी सर्वांसाठी पाणी धोरण योजना अमलात आणली व या धोरणात प्रकल्पबाधित, झोपडीधारक, खाजगी जमिनीवरील झोपडीधारकांसह मागेल त्याला नळजोडणी देण्याचा

निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास महानगरपालिका व अधिकारी यांच्या जाचक अटीमुळे पाणी धोरणाची जलदगतीने अंमलबजावणी होत नसल्यामुळे गरजू रहिवासींना पाणी चोरून अथवा विकत घेवून पाणी वापरावे लागते त्यामुळे लाखो लिटर पाणी गळती होऊन वाया जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२४) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी क्षेत्रासाठी दिनांक ०१.०५.२०२२ पासून "सर्वांसाठी पाणी" हे धोरण अंमलात आणले आहे.
सदर धोरणानुसार सर्व घोषित व अघोषित झोपडपट्टी क्षेत्रातील रहिवाशी, खाजगी जमिनीवरील रहिवाशी अशा सर्व निवासी रहिवाशांसाठी आवश्यक त्या कागदपत्रांच्या व अटींच्या पूर्ततेनंतर पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने जलजोडणी दिली जाते.
(२) हे खरे नाही.
(३) "सर्वांसाठी पाणी" या धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांसाठी जलजोडणी देण्यात येत असून, आजअखेर प्राप्त एकूण ८७९३ जलजोडण्यांपैकी कागदपत्रांची पूर्तता झालेल्या एकूण ७७१४ अर्जदारांना परवानगीपत्र देण्यात आले आहे. सदर परवानगीपत्रातील अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या सुमारे ३३०० अर्जदारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत जलजोडणी देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ईस्टर्न फ्री-वे मार्गावर पी. डिमेलो मार्गावरून ते ग्रँट रोड स्टेशन प्रस्तावित मार्ग (पूल) निविदा रद्द करून नव्याने निविदा करत असलेबाबत

**(४९) ७१५७४ (१५-०९-२०२३). श्री. रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ईस्टर्न फ्री-वे मार्गावर पी. डिमेलो मार्गावरून ते ग्रँट रोड स्टेशन प्रस्तावित मार्ग (पूल) निविदा रद्द करून नव्याने निविदा करत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईकरांचा प्रवास अधिक सुखकर आणि सुरळीत व्हावा यासाठी दक्षिण मुंबईतील पी. डिमेलो मार्गावरील ऑरेंज गेट नजिक सुरु होणाऱ्या या ईस्टर्न फ्री-वे येथून हा मार्ग ग्रँट रोड स्टेशन परिसरापर्यंत प्रस्तावित मार्ग (पूल) करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने प्रशासकीय कार्यवाही करून याबाबतची निविदा प्रकिया फेब्रुवारी २०२३ मध्ये राबविली गेली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यावेळी सदर प्रकल्पाला अंदाजे रुपये ६३८ कोटी खर्च अपेक्षित असून सदर खर्च वाढीमुळे (Cost Escalation) निविदा रद्द करण्यात येणारा आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकल्पासाठी खर्च वाढीचा (Cost Escalation) अहवाल सल्लागार यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०१-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर पूर्व मुक्त मार्ग (ऑरेंज गेट) ते ग्रँट रोडपर्यंत ५.५६ कि.मी. लांबीचा प्रस्तावित उन्नत मार्ग मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हद्दीतून सुमारे ३५० मीटर इतका प्रस्ताविण्यात आला असल्याने, प्रकल्पाच्या बांधकामासाठी प्राथमिक मान्यतेकरिता मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना प्रस्ताव सादर केला होता. त्याअनुषंगाने मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचे अभिप्रायानुसार सल्लागाराने

संकल्पचित्रात सुधार करुन, पुनर्निविदा मागविण्याकरिता अंदाजपत्रकातील रकमेत नव्याने देखभाल खर्च व कास्टींग यार्डचे वाढीव दर सुचविले आहेत.

त्यानुसार सल्लागाराकडून सुधारीत प्रस्तात मागविण्यात आला असून, प्रस्तावित प्रकल्पासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचे ना-हरकत प्रमाणपत्र / प्राथमिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर व त्यातील अटी व शर्तींच्या अनुषंगाने बदल करणे या बाबींचा निविदेमध्ये समावेश करुन निविदा मागविण्याबाबतचा पुढील निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात येणार आहे.

(५) हे खरे आहे.

---

## वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रातील आरंभ अपार्टमेंटचे बांधकाम अनधिकृत असल्याबाबत

**(५०) ७१५७७ (१५-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील आरंभ अपार्टमेंट, मु.पो. आगाशी, बाजारपेठ, विरार (प.) (ता.वसई, जि. पालघर) ही इमारत अनधिकृत असल्याचे महानगरपालिका प्रशासनाकडून नोटीस देण्यात आली असतानाही आजमितीस पालिका प्रशासनाकडून सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याची बाब माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेचे तत्का. श्री. प्रमोद चव्हाण, प्र.सहा. आयुक्त, विशेष नियोजन प्राधिकरण (पश्चिम विभाग) यांनी आरंभ अपार्टमेंटच्या मुळ मालकांना वविशम/वि.नि.प्रा./११६/१३/२०२१-दिनांकित २५/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत महानगरपालिकेकडे स्थानिकांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अपार्टमेंटच्या अनधिकृत बांधकामाबाबत तत्का. श्री. प्रमोद चव्हाण, प्र.सहा. आयुक्त, विशेष नियोजन प्राधिकरण (पश्चिम विभाग) यांनी आर्थिक संगनमत केले असल्याने सदरहू प्रकरणी ते जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार आरंभ अपार्टमेंटच्या अनधिकृत बांधकामास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०१-२०२४) :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची तक्रार महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झाली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार उक्त बांधकाम तत्कालीन सिडको प्राधिकारणाच्या काळात करण्यात आले आहे. तथापि, सदर प्रकरणी महानगरपालिका स्तरावर बांधकाम परवानगी, मालमत्ता नोंदणी इत्यादीच्या अनुषंगाने पत्र व्यवहार करण्यात आला असून महानगरपालिकेमार्फत संबंधित इमारत विकासकास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाद्वारे कायदेशीर नोटीस तसेच इमारतीमधील सदनिका धारकांना मालकी हक्काबाबतची कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सबंधित विकासकाविरुध्द विरार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याबाबत विशेष नियोजन प्राधिकारी स्तरावरुन पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

दरम्यान सदर प्रकरणी दिवाणी न्यायालय, वसई येथे विकासकाकडून दावा दाखल झाला असून उपरोक्त दाव्यामध्ये झालेल्या स्थगिती आदेशास अनुसरून सदरच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.